# यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

**(महाराष्ट्र शासनाने वर्ष 1989 मध्ये स्थापिलेले)**

ज्ञानगंगा घरोघरी

## व्यवस्थापन मंडळ बैठक

# कार्यवृत्त

| | | |
|---|---|---|
| बैठक क्रमांक | : | 171 |
| स्थळ | : | प्रशासकीय इमारत<br>यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ<br>नाशिक, 422 222 |
| वार व दिनांक | : | मंगळवार , दिनांक :17डिसेंबर, 2019 |
| वेळ | : | सकाळी 11:30वाजता |

# यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

**(महाराष्ट्र शासनाने वर्षे 1989 मध्ये स्थापिलेले)**

---

171वी, व्यवस्थापन मंडळ बैठक,मंगळ , दिनांक 17 डिसेंबर2019 रोजी सकाळी 11:30 वाजता, प्रशासकीय इमारत येथे आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीस खालील सदस्य उपस्थित होते.

| | |
|---|---|
| 1. मा प्रा.ई वायुनंदन, कुलगुरु, | अध्यक्ष |
| 2.मा.डॉ. दिलीप म्हैसेकर, कुलगुरू,नाशिक | सदस्य |
| 3.मा. डॉ.अनिल कुलकर्णी, पुणे | सदस्य |
| 4.मा.श्री.ज्ञानदेव नाठे,संचालक, तंत्रशिक्षण, यांचे प्रतिनिधी | सदस्य |
| 5.डॉ. दिनेश भोंडे, कुलसचिव | सदस्य सचिव |

**खालील सदस्यांची अनुपस्थिती मान्य करण्यात आली.**

| | |
|---|---|
| 6.मा. सचिव,उच्च व तंत्रशिक्षण,मुंबई | सदस्य |
| 7.मा. सचिव, उद्योग, मुंबई | सदस्य |
| 8.मा.मा. सचिव, कृषी, मुंबई | सदस्य |
| 9. मा. संचालक (शिक्षण), पुणे | सदस्य |
| 10मा.संचालक,व्यावसायिक शिक्षण व प्रशिक्षण | सदस्य |
| 11. मा.डॉ.आशिष पातुरकर, कुलगुरू,नागपूर | सदस्य |
| 12.मा.श्री. हेमंत आंबासेलकर, नागपूर | सदस्य |
| 13.मा.डॉ.सचिन मांडवगणे, नागपूर | सदस्य |

| क्र. | ठराव क्र. | तपशील |
|---|---|---|
| 171.1.0 | 170.1.1 | **मा.कुलसचिवांनी सर्व उपस्थित सदस्यांचे स्वागत केले.त्यानंतर विद्यापीठास प्राप्त झालेल्या पुरस्काराची माहिती दिली.**<br>दि.3 डिसेंबर 2019 रोजी नवी दिल्ली येथे Ministry of Human Resource Development, Govt of India, New Delhi यांनी स्वच्छ परिसर (Non Residential Universities) हा पुरस्कार यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठास प्राप्त झाला आहे.या कार्यक्रमास मा. कुलगुरू व मा. कुलसचिव उपस्थित होते. |
| 171.2.0 | 171.2.1 | दि.18ऑक्टोबर2019रोजी झालेल्या 170व्या व्यवस्थापन मंडळबैठकीचे कार्यवृत्त वाचून कायमकरणे<br>**व्यवस्थापन मंडळ ठराव-** दि. 18 ऑक्टोबर2019रोजी झालेल्या 170व्या व्यवस्थापनमंडळाच्या बैठकीचा कार्यवृत्तांत वाचून सर्वानुमते कायम करण्यात आला. |
| **बांधकाम कक्ष** | 171.2.2 | दि.18ऑक्टोबर2019रोजी झालेल्या 170व्या व्यवस्थापन मंडळाच्या बैठकीतील झालेल्या निर्णयावरीलकार्यवाहीचा अहवाल.<br>**व्यवस्थापन मंडळ ठराव-** दि.18 ऑक्टोबर2019रोजी झालेल्या 170व्या व्यवस्थापन मंडळाच्या बैठकीतील झालेल्या निर्णयावरीलकार्यवाहीचाअहवालाची नोंद घेण्यात आली तसेच,व्यवस्थापन मंडळ ठरावक्र.170.3.2नुसार यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त |

| | | |
|---|---|---|
| | | विद्यापीठ,नाशिक व टाटा इन्स्टिटयुट ऑफ सोशल सायन्स, मुंबईयांच्यात दिव्यांगांना उपलब्ध करुन द्यावयाच्या सोयी सुविधा यासाठी करारातील मुद्दा क्र. १२ नुसार Appointment of two I Access Fellows with Disablility Expertise from the Disability Budget of the University for Two years, With the Salary Rs. 35,000/-per month and Hostel/accomodation in University Campus.<br>त्यानुसार शिक्षणशास्त्र विद्याशाखेत बी.एड. (स्पेशल) या शिक्षणक्रमांकरिता चार व्यक्तींची नेमणुक करण्यात आलेली आहे.याबाबत संबंधितांना कळवावेअसे ठरले |
| 171.3.0 | | **सखोल चर्चेचे विषय** |
| **कुलसचिव कार्यालय, वित्त अधिकारी** | 171.3.1 | नाशिक येथील स्थानिक वृत्तपत्रात प्रसिध्द बातम्यामधील सत्यता पडताळणी समितीच्या अहवालावर कार्यवाही सुचविण्याकरिता डॉ.अनिल कुलकर्णी, व्यवस्थापन मंडळ सदस्य यांच्या अध्यक्षतेखाली नेमण्यात आलेल्या समितीची अहवाल विचारार्थ<br>**व्यवस्थापन मंडळ ठराव** - नाशिक येथील स्थानिक वृत्तपत्रात प्रसिध्द बातम्यामधील सत्यता पडताळणीसाठीडॉ.संजय खडक्कार यांच्या समितीने अहवाल सादर केला होती. या अहवालातील आर्थिक प्रकरणांची सखोल शहानिशा करणे आवश्यक आहे असे व्यवस्थापन मंडळ सदस्य डॉ.दिलीप म्हैसेकर व श्री ज्ञानदेव नाठे यांनी सांगितले.त्यानुसार आर्थिक प्रकरणे डॉ.संजय खडक्कार, वित्त अधिकारी व अन्य एक अधिकारी यांच्या समितीने एकत्रितपणे सर्व प्रकरणे तपासावीत,त्यानंतर सविस्तर अहवाल डॉ.अनिल कुलकर्णी यांच्या समितीकडे सादर करावा असे निर्देश दिले.<br>मा.कुलसचिव यांनी यासंदर्भात जिल्हा भ्रष्टाचार समिती, नाशिक येथे यातील 04 प्रकरणे असून त्याबाबत अंतिम अहवाल देण्याबाबत मा. जिल्हाधिकारी यांनी वेळोवेळी बैठकीत सांगितले आहे. यावर सखोल चर्चा करून वरील प्रकरणात डॉ.संजय खडक्कार यांच्या सत्यता पडताळणी समितीने04 प्रकरणांबाबत अहवालात दिलेले मत विचारात घेऊन, त्याआधारे योग्य ती कार्यवाही करत असल्याबाबत जिल्हा भ्रष्टाचार समितीला कळवावे असे निर्देश देण्यात आले यास मान्यता देण्यात आली. |
| **आस्थापना** | 171.3.2 | शासनाच्या दि. 13 ऑगस्ट 2019व दि.17सप्टेंबर 2019पत्रान्वयेव्यवस्थापन मंडळास दिलेल्या अधिकारानुसार वयोधिक्य व इतर त्रुटी क्षमापित करण्याबाबत डॉ.अनिल कुलकर्णी, व्यवस्थापन मंडळ सदस्य यांच्या अध्यक्षतेखाली गठीत झालेल्या समितीचा अहवाल पुढील कार्यवाहीसाठी<br>**व्यवस्थापन मंडळ ठराव**- व्यवस्थापन मडळ ठराव क्र,.170.3.10 दिनांक 18.10.2019 नुसार ठरल्याप्रमाणे वयोधिक्य क्षमापित करण्याबाबत व इतर प्रकरणांबाबत व्यवस्थापन मंडळ सदस्य डॉ.अनिल कुलकर्णी यांच्या अध्यक्षतेखाली गठीत केलेल्या समितीने 16 प्रकरणात शासनाने दर्शविलेल्या आक्षेपांसंदर्भातील सर्व आवश्यक कागदपत्र तपासून शिफारशीसहीत प्रकरणे निकाली काढण्यासंदर्भातील अहवाल व्यवस्थापन मंडळास सादर केला.व्यवस्थापन मंडळासमोर प्रत्येक प्रकरण सादर करण्यात येऊन त्यावर सखोल चर्चा करण्यात आली.त्यानुसार सध्या सेवानिवृत्त 16 प्रकरणांपैकी 09प्रकरणात आक्षेप आढळून आलेला नसल्यामुळे आक्षेप वगळण्याची व 07 प्रकरणात वयोधिक्य क्षमापित करण्याचा निर्णय व्यवस्थापन मंडळाने सर्वानुमते घेतला आहे.(सहपत्र १ पहावे.)<br>त्यानुसार 16 निवृत्त अधिकारी व कर्मचा-यांचा प्रस्ताव लेखी स्वरुपात पत्राद्वारे, सहसंचालक कार्यालय,उच्च तंत्रशिक्षण विभाग,पुणे यांच्याकडे पाठवण्याबाबत निर्देश देण्यात आले. |
| **आरोग्य विज्ञान विद्याशाखा** | 171.3.3 | विद्यापीठातील नियमित शिक्षक, शिक्षकेतर अधिकारी व कर्मचारी यांच्या कुटुंबियांना, आरोग्य सेवा पुरविण्याच्या शासकीय विमा कंपनीकडून मेडिक्लेम योजना सुरु करण्याबाबतची बाब विचारार्थ<br>**व्यवस्थापन मंडळ ठराव** - विद्यापीठातील नियमित शिक्षक, शिक्षकेतर अधिकारी व कर्मचारी यांच्या कुटुंबियांना, आरोग्य सेवा पुरविण्याच्या शासकीय विमा कंपनीकडून |

| | | |
|---|---|---|
| | | मेडिक्लेम योजना सुरु करण्याबाबतची कार्यवाही अपुर्ण आहे, त्यामुळे पुढील व्यवस्थापन मंडळ बैठकीत विषय ठेवण्यात यावा असे सर्वानुमते मान्य करण्यात आले. |
| आस्थापना | 171.3.4 | नोव्हेंबर 2005 नंतर नियमित वेतन श्रेणीत नियुक्ती केलेल्या शिक्षक, शिक्षकेतर आधिकारी व कर्मचारी यांना NPS योजना लागु करण्याची बाब<br>**व्यवस्थापन मंडळ ठराव**—या अनुषंगाने HDFC कंपनीच्या अधिका-याने केंद्र शासनाच्या NPS योजनाबाबत माहिती व्यवस्थापन मंडळापुढे सादर केली,NPS योजनेसंदर्भात वित्त विभागाने यासंबंधी सर्व माहिती घेऊन, टिप्पणी सादर करावी तसेच सदरील विषय वित्तसमितीकडे पाठविण्यात यावा यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली |
| आस्थापना | 171.3.5 | विद्यापीठातील शिक्षकेतर अधिकारी व कर्मचारी यांना सातवा वेतन आयोग लागू न झाल्यामुळे इंटेरीयम देण्याबाबतची बाब विचारार्थ<br>**व्यवस्थापन मंडळ ठराव** - महाराष्ट्र शासनाकडून अजुनही महाराष्ट्रातील सर्व अकृषी विद्यापीठांना सातवा वेतन आयोग लागू करण्यात आलेला नाही असे व्यवस्थापन मंडल सदस्य डॉ. दिलीप म्हैसेकर व डॉ. अनिल कुलकर्णी यांनी सांगितले याबाबत जानेवारी २०२० पर्यंत शासनाकडून शासन निर्णय निर्गमित होण्याची कार्यवाही अपेक्षित आहे. |
| 171.4.0 | | ऐनवेळचे विषय |
| वाणिज्य व व्यवस्थापन | 171.4.1 | डॉ.सुरेंद्र नरेंद्र पाटोळे यांच्या पीएच.डी.पदवीबाबत<br>**व्यवस्थापन मंडळ ठराव** - डॉ.सुरेंद्र नरेंद्र पाटोळे यांच्या पीएच.डी.पदवी वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा परिषदेत सदरील विषय ठेवावा व त्यांनतर संबंधित प्राधिकरणाकडे पाठवाव यास मान्यता देण्यात आली. |
| आस्थापना | 171.4.2(1) | दि. 9 मार्च 2019रोजी झालेल्या तक्रार निवारण (**Grivenace Committee**) समितीचे निर्णयाबाबत मा.कुलगुरू यांनी दिलेल्या निर्देशानुसार खालील प्रकरणे व्यवस्थापन मंडळापुढे ठेवण्यात आली.<br>01) पवार चंद्रकांत सुरेश—<br>**तक्रारीचे स्वरुप** - सहायक कुलसचिव अ.जा.संवर्ग पदोन्नती देतांना झालेला अन्याय<br>**तक्रार निवारण** (Grivenace Committee)**समिती अभिप्राय**- पद रिक्त होण्याच्या दिवसापासून मानीव दिनांक दिल्यास इतर तांत्रिक अडचणी निर्माण होण्याची शक्यता असल्यामुळे पदोन्नती कार्यवाहीचा 1महिन्याचा कालावधी गृहीत धरुन 1महिन्याचा कालावधी नंतर पदोन्नती देण्यात यावी असे ठरले.<br>**व्यवस्थापन मंडळ ठराव**—वरील अनुषंगाने तक्रार निवारण (**Grivenace Committee**) समितीच्या निर्णयास मान्यता देण्यात आली तसेच पद रिक्त होण्याच्या एक महिन्यानंतर पदोन्नतीचा मानवी दिनांक देण्याचे निर्देश देण्यात आले. व्यवस्थापन मडळाच्या माननीय सदस्यांनी या अनुषंगाने कायदेशीर अडचणी येऊ नये म्हणून मागील वेतन आदी सर्व लाभ देण्याचे आवश्यक आहे असे निवेदन केले त्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली. |
| | 171.4.2(2) | 02) वनिता श्रीकृष्ण रोडगे<br>**तक्रारीचे स्वरुप** -Pay-Scale मिळणेबाबत<br>**तक्रार निवारण** (Grivenace Committee) **समिती अभिप्राय** - सध्याविद्यापीठासशासननिर्णयानुसार मंजुर केलेली वेतनश्रेणी लागु करण्यात यावी असे प्रस्तावित करण्यात आले.<br>**व्यवस्थापन मंडळ ठराव** - तक्रार निवारण (**Grivenace Committee**) समितीच्या अभिप्रायानुसार श्रीमती वनिता रोडगे सदर पदाला लागणारी आवश्यक पात्रता आहे त्यामुळे शासनाने मंजुर केलेली वेतनश्रेणी देण्यात यावी,सदर पद शासनाने मंजुर केलेले आहे, मात्र कृषी विज्ञान केंद्राच्या यापदास कमी वेतनश्रेणी आहे.कृषी विज्ञान केंद्राने सदर |

| | | |
|---|---|---|
| | | वेतन मंजुर व केल्यास अतिरिक्त भार विद्यापीठाने द्यावा असा निर्णय घेण्यात आली यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली. |
| 171.5.0 | 171.5.0 | **कार्योत्तर मान्यतेचे विषय** |
| आस्थापना | 171.5.1 | विद्यापीठ अनुदाने आयोगाच्या आवश्यकतेनुसार विद्यापीठातील विद्याशाखांमध्ये राबविण्यात येणाऱ्या शिक्षणक्रमांसाठी शैक्षणिक संयोजक नियुक्ती करणेबाबत मा. कुलगुरूंनी दिलेल्या निर्देशानुसार विद्यापीठ परिनियम 11(2 of 1993)अन्वये करारावर एकत्रित वेतनावर एकूण ३३ पदे शैक्षणिक पात्रतेनुसार भरण्यास व त्यानुसार प्रसिध्द केलेल्या जाहीरातीस कार्योत्तर मान्यता मिळणेबाबत तसेच उमेदवाराकडून **Online** अर्ज करण्यासाठी आरक्षित प्रवर्गातील उमेदवाराकडून रु. 150/- आणि खुल्या प्रवर्गातील उमेदवाराकडून रु. 300/- प्रक्रिया शुल्क घेण्यास मान्यता मिळणेस कार्योत्तर मान्यता मिळणेबाबत<br>**व्यवस्थापन मंडळ ठराव** - मा. कुलगुरूंनी दिलेल्या निर्देशानुसार विद्यापीठ परिनियम 11(2 of 1993)अन्वये करारावर एकत्रित वेतनावर एकूण ३३ पदे शैक्षणिक पात्रतेनुसार,आरक्षणानुसार भरण्यास व त्यानुसार प्रसिध्द केलेल्या जाहीरातीस तसेच उमेदवाराकडून **Online** अर्ज करण्यासाठी आरक्षित प्रवर्गातील उमेदवाराकडून रु. 150/- आणि खुल्या प्रवर्गातील उमेदवाराकडून रु. 300/- प्रक्रिया शुल्क घेण्यास केलेल्या कार्यवाहीची नोंद घेण्यात आली. |

मा.कुलगुरू तथा अध्यक्ष यांच्या परवानगीने बैठक संपल्याचे कुलसचिव यांनी जाहीर केले.

**सदस्य सचिव**
**व्यवस्थापन मंडळ**

**अध्यक्ष**
**व्यवस्थापन मंडळ**